वादीतर्फे साक्षीदार क्र.१- दुर्गाबाई श्रीराम बिरो,

उलट तपास प्रतिवादी क्र. १ आणि २ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. केला यांच्यातर्फे

५. माझ्या सर्व नातेवाईक, उपरोक्त नमुद केलेल्या नातेवाईकांना लिहिता वाचता येते. माझे पती मयत झाल्यानंतर मी बामणी येथे राहणे चालु केले. बामणी येथे माझे वडील राहतात. बामणी वरुन साटक येथे पोहचण्यासाठी अंदाजे एक तास वेळ लागतो. हे म्हणणे खरे आहे की पती मयत झाल्यानंतर, गावातील आणि घरातील लोक अपमाणास्पद वागणुक देत होते आणि शेती करु देत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की मला शेती करु देत नव्हते, त्यामुळे मला पैशाची गरज होती. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मी शेती विकण्यास काढली होती. हे म्हणणे खरे नाही की महाविरपुरे आणि इंदुबाई पुरे यांना मी शेतजमिनीसाठी खरेदीदार घेवुन या, असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की महाविरपुरे यांनी प्रतिवादी क्र. १ नारद यांची ओळख करुन दिली होती. माझी नारदसोबत ओळख माझे पती मयत झाल्यानंतर झाली होती. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस माझा करार दिनांक २२/०१/२००९ रोजी प्रतिवादी क्र.१ नारद सोबत झाला होता, त्यावेळेस माझे वडील, चंद्रहास महाविरपुरे, एकराम रघुनंदन बेहेरखेडे आणि इंदुबाई हे हजर होते तसेच वादी क्र.२ रमेश हा देखिल हजर होता आणि त्यावेळेस करारनामा त्यांच्या उपस्थित दिनांक २२/०१/२००९ रोजी झाला होता. माझ्याजवळ जे कागदपत्र होते ते सर्व मी दाव्याकामी दाखल केलेले आहेत. खरेदीपत्र करण्यासाठी सहा महिण्याची मुदत होती. मी ज्यावेळेस शेती विकण्यास काढली, त्यावेळी ती शेती वर्ग २ मध्ये होती. हे म्हणणे खरे आहे की शेतजमिन वर्ग-२ मधुन वर्ग १ करण्याची जबाबदारी आमची होती. हे म्हणणे खरे आहे की मोजणी करण्याची जबाबदारी देखिल आमची होती.

६. हे म्हणणे खरे आहे की खरेदीपत्र करण्यावेळेस, ठरलेल्या मुदतीमध्ये, मोजणी झालेली नव्हती आणि शेतजमिन वर्ग-१ची देखिल झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मी मुदतवाढीचा करारनामा प्रतिवादी क्र.१ ला लिहून दिला होता. हे म्हणणे खरे आहे की जसी-जसी मला पैशाची गरज लागत होती तसे-तसे मी पैसे प्रतिवादी क्र.१ कडुन घेत होती. हे म्हणणे खरे आहे की मुदतवाढीचा करारनामा हा चंद्रहासपुरे, माझे मामा, इंदुबाई पुरे, माझे वडील यांच्या उपस्थितीत करण्यात आला होता.

७.	हे म्हणणे खरे आहे की मी वडीलाकडे राहत असल्यामुळे शेतजमिन ही पडीत होती. हे म्हणणे खरे आहे की खरेदीपत्र होईपर्यंत मी शेतजमिन ही ठेक्याने दिली होती. हे म्हणणे खरे नाही की मी शेतजमिन गुंडेराव मसराम याला ठेक्याने दिली होती. हे म्हणणे खरे आहे की ठेक्याने देतांना ठेकापत्र बनविण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की ठेकापत्र हे माझे वडील, भाउ, इंदुबाई, चंद्रहास महापुरे आणि मामा यांच्या उपस्थित लिहिण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की ठेकापत्राच्या वेळेस मला पैसे मिळाले होते.

८.	हे म्हणणे खरे आहे की माझे पती मयत झाल्यानंतर मी आणि माझे मुल हे वादग्रस्त मिळकतीचे एकमेव मालक होतो. घरातील मी मुख्य माणुस होते, त्यामुळे व्यवहार हा मिच करणार होते.

प्रश्न-	विक्रीपत्राच्या वेळेस, इंदुबाई, चंद्रहास माहापुरे, तुमचे वडील, मामा आणि भाउ हजर होते ?

उत्तर	माझ्या जबरदस्तीने सहया घेण्यात आल्या, मला पैसे देण्यात आले नाही.

हे म्हणणे खरे नाही की खरेदीपत्राच्या वेळेस वरिल सर्व लोक हजर होते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की मी आणि माझे दोन्ही मुल हजर होते. हे म्हणणे खरे नाही की खरेदीपत्र वाचुन मी आणि इतर सर्वांनी सहया केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की खरेदीपत्र मी आणि माझ्या नातेवाईकांनी समजुन उमजुन सहया करुन लावले आहे. हे म्हणणे खरे आहे की खरेदीपत्रानंतर ताबा हा प्रतिवादी क्र.१ आणि २ ला देण्यात आला होता. खरेदीपत्रानंतर, प्रस्तुत दावा हाच प्रथम दावा होता, इतर कोणताही दावा मी दाखल केलेला नाही. माझे भाउ आणि वडील शिकलेले आहेत. मी प्रतिवादी क्र. १ ला ठेक्याने जमिन दिल्याबददलचे कागदपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१ बाबतचे ठेक्याचे कागदपत्र दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की कागदपत्र न देण्याचे कारण म्हणजे प्रतिवादी क्र.१ ला ठेक्याने जमिन दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की खरेदी पत्राची संपुर्ण रक्कम मला मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की जमिनीच्या किंमती वाढल्या असल्यामुळे, हा खोटा दावा दाखल केला आहे.

हे म्हणणे खरे नाही की बेनीरामसोबत माझे पटत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की शेती विकल्यानंतर बामणी येथे शेती घेण्याचे मी ठरविले होते. हे म्हणणे खरे आहे की शेषरावने माझ्या नावाने आणि माझा भाउ आणि मुलाच्या नावाने खरेदीपत्र करुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की

ज्यावेळेस व्यवहार होते, त्यावेळेस माझे वडील आणि भाउ माझ्या सोबत राहत होते. प्रतिवादी क्र.१ ने शेषराव सोबत मिळुन, खरेदीपत्र केल्याबाबतची तक्रार मी पोलीस स्टेशनला दिली होती. तक्रार दाखल आहे किंवा नाही हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की तक्रार दाखल केली नसल्यामुळे तक्रार दाखल करु शकत नाही. शेषराव कडुन घेतलेल्या जमिनीचा कब्जा हा माझ्याजवळ आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र. १ कडुन शेतजमिन मिळण्याकामी हे खोटे आरोप केले आहेत.

कोर्टाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

E.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.11.04 15:11:48 +0530

दिनांक ४.११.२०२५
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : Shri. R. J. Khobragade (Gr.-II)